# विदयार्थ्यांकरीता मार्गदर्शक सुचना/ आचारसंहिता

SIAC व इतर संस्थेतील दिनांक ०८.०९.२०२५ ते १३.०९.२०२५ च्या कालावधीत मुलाखत देणा-या विदयार्थ्या करीता **मार्गदर्शक सुचना/ आचारसंहिता** तयार करण्यात आली आहे .

१) विदयार्थ्यांचा मुलाखत कार्यक्रम दिनांक ०८.०९.२०२५ ते १३.०९.२०२५ रोजी सकाळी १० ते संध्याकाळी ६ वाजेपर्यत ऑनलाईन पदधतीने आयोजीत करण्यात आलेला आहे. मुलाखतीची यादी SIAC च्या संकेतस्थळावर नोटीस बोर्ड वरील ऑनलाईन मुलाखत कार्यक्रम वेळापत्रक मध्ये मुलाखत केंद्र निहाय देण्यात आलेला आहे. त्यात आपण आपला आसन क्रं. नाव शोधुन दिलेल्या वेळेत मुलाखतीस ऑनलाईन उपस्थीत रहावे.

२) मुलाखतीत सहभागी होतांना आपल्या दिलेल्या वेळेतच आपण मुलाखतीसाठी लिंक व्दारे जॉईन व्हावे. मुलाखती दरम्यान विदयार्थ्यांची अन्य परीक्षा असल्यास त्यामुळे मुलाखतीमध्ये सहभागी होणे शक्य नसल्यास तशी पूर्वसूचना देऊन विदयार्थ्यांनी संबधीत **मुलाखत केंद्रातील** संचालकांच्या कार्यालयांस पुरक कागदपत्रासह लेखी ई -मेल व्दारे कळवावे.

३) विदयार्थ्यांच्या प्रोफाईलमध्ये मुलाखतीचा दिनांक, वेळ, स्थळ, कळविण्यात आलेले आहे. तसेच आपणांस मोबाईल नंबरवर संदेश पाठविण्यात आलेला आहे. तसेच ई-मेलवर मुलाखतीसाठीचा व्हॉटअॅप ग्रुपची लिंक आपणांस पाठविण्यात येईल व्हॉटसअॅप तसेच मुलाखतीच्या अनुंषंगाने आपणांस ई- मेलव्दारे सुदधा कळविण्यात आलेले आहे. अधिक माहीतीसाठी आपण आपल्या **व्हॉटसअॅप** ग्रुपच्या सुचनाचे पालन करावे. तसेच लिंक बाबत काही बदल असल्यास आपणांस **व्हॉटसअॅप** ग्रुपव्दारे कळविण्यात येईल. अधिक माहितीसाठी www.siac.org.in या संकेतस्थळाचे अवलोकन करावे.

४) मुलाखतीच्या नियोजित वेळेच्या पाच मिनिटे आधी जॉईन होउन /समूहात उपस्थित राहून लिंकवर क्लिक करून मुलाखतीसाठी आपला प्रवेश निश्चित करावा. आपण उशिरा आल्यास मुलाखती घेण्याबाबतचा अंतिम निर्णय संचालकांचा राहील.

५) समूहात दिलेली लिंक बाहेरच्या व्यक्तीला देऊ नये./**हस्तांतर करु नये.**

६) मुलाखतीस उपस्थित राहताना औपचारिक पोशाख परिधान करावा.

७) ज्यावेळी आपल्याला बोलण्याची संधी दिली जाईल तेंव्हाच आपला ऑडिओ चालू(unmute) करावा. इतरवेळी तो बंद (mute) असावा.आपण बोलत असताना आजूबाजूला होणारे इतर आवाज जसे की पंखा, टीव्ही, रस्त्यावरील रहदारीचा आवाज, घरातील भांड्यांचे आवाज, इत्यादी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

८) जर आपण व्हिडिओ ऑन ठेवणार असाल तर पुढील काळजी घ्यावी.

i) आपल्या चेहऱ्यावर प्रकाश येईल अशा पद्धतीने आपली बैठक ठेवावी. आपल्या पाठीमागे प्रकाश असेल (किंवा कॅमेऱ्यासमोर प्रकाश असेल) तर आपला चेहरा नीट दिसणार नाही.

ii) व्हिडिओत आपली पार्श्वभूमी व्यवस्थित असावी. आपल्या पाठीमागे पडदा अथवा भिंत असावी.

iii) व्हिडिओ चालू असताना बेडवर अथवा सोफ्यावर आडवे होऊन कार्यक्रम ऐकणे / पाहणे/डोळे मिटून बसणे टाळावे.

iv) मुलाखत चालू असताना खानपान अथवा चहापान करू नये.

९) आपली मोबाईल स्क्रीन सारखी मध्ये शेअर करू नये. त्यामुळे सर्वांना प्रचंड त्रास होतो.

१०) आपणास काही सांगावयाचे असल्यास raise hand, Chat Box हे ऑप्शन्स वापरून सांगता येईल.

११) आपला ऑडिओ आणि व्हिडिओ बंद केल्याची खात्री केल्याशिवाय अनौपचारिक बोलू अथवा दिसू नये.

१२) सदर मुलाखती दरम्यान विदयार्थ्यांनी सोबत ओळखपत्र ठेवावे संचालकांनी ओळखपत्राची मागणी केल्यास त्यांना ऑनलाईन दाखवावे.

**१३) काही केंद्रावर मुलाखत ०२ पॅनलव्दारे घेतले जाणार आहे त्यांनी पॅनेल क्रं अचुक निवडून मुलाखत दयावी.**

१४) सदर मुलाखती मध्ये विदयार्थ्यानी  आपल्या ऐवजी दुस-यास बसवुन मुलाखत  देण्याचा प्रयत्न केल्यास  सदर विदयार्थ्यावर आयटी **ॲक्ट २०००** अन्वये बनावट ओळख केल्याबाबत आपणांवर **विहीत** कार्यवाही करण्यात येईल यांची नोद घ्यावी.

!! सर्वाना  मुलाखतीसाठी शुभेच्छा !!

**सही/-**
**(डॉ. भावना पाटोळे )**
**संचालक,राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था,मुंबई**
**तथा समन्वयक, एकत्रित सामायिक प्रवेश परीक्षा**